# प्रियकराच्या अपेक्षा

प्रेम कर माझ्यावर तुझ्या मार्दवाने
आणि भावपूर्ण प्रेमयुक्त नजरेने
उजळवून टाक मला प्रेमाने
आणि स्वीकार मला पूर्णपणाने

अर्पण कर तुझे तारुण्य मला
प्रेमभऱ्या मुक्त हस्ताने, मनाने
देऊ देत प्रेमवचन मला
ओठ तुझे शांत हळुवारपणाने

प्रेम कर निळ्याभोर डोळ्यांनी
औत्सुक्याने भरलेल्या
आभाळाचे रंग घेऊनि
स्वर्गीयतेने भारलेल्या

हलकेच वर्षणाऱ्या हिमाप्रमाणे
लवणाऱ्या पापण्यांनी प्रेम कर
तुझ्या माझ्या हृदयाचे गाणे
ऐकू दे साऱ्या जगाला

तुझ्या बाहुपाशांनी घेऊन कवेत
प्रेम कर मुक्त रिक्त मनाने
तुझ्या नाजूक पदरवांसवेत
जाणवेल थबकणाऱ्या पावलाने

माझ्याचसाठी कोमल होणाऱ्या
मधुर स्वरांनी प्रेम कर
बोलताच मी उठणाऱ्या
गालांच्या लालीने प्रेम कर

प्रेम कर तुझ्या विवेक बुद्धीने
जी रोखेल माझे उसासे
प्रेम कर तुझ्या विचार लहरीने
कसेही पडत जीवनाचे फासे

जगाने दिलेला मुकुट लेऊन
दिमाखाने तू प्रेम कर
ईश्वरापुढे गुडघे टेकून
माझ्यासाठी प्रार्थना कर

वनाच्या छायेतून विहरणाऱ्या
साध्वीप्रमाणे विशुद्ध प्रेम कर
हर्षावेगाने बिलगणाऱ्या
सुंदरीप्रमाणे मला जवळ कर

आज आणि अंतिम क्षणीही
दे मला सौख्य जीवनभर
जीवन मृत्यूच्या पलीकडेही
अलौकिक प्रेम कर माझ्यावर

तुझ्या प्रेमाची उत्कटता दाखवेल
प्रिये, तुझ्या चेहऱ्यावरची खुषी
माझं प्रेम मात्र तुझ्याइतकं नसेल
पुरुषांचं प्रेम असतंच अल्पायुषी!

“A Man's Requirements” by Elizabeth Barrett Browning
Translated by Abhay B. Joshi and Milind A. Toro